


दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार । २२/०४/२०२६ । पाने - ६




# शिवसेना महायुतीचे बस स्थानकावर निदर्शने

## महिलांचा हक्क नाकारणाऱ्या इंडिया आघाडीचा केला निषेध




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - लोकसभेमध्ये मोदी सरकारकडून मांडण्यात आलेल्या नारीशक्ती विधेयकाला काँग्रेससह इंडिया आघाडीच्या पक्षांनी विरोध केल्याने हे विधेयक पारित होऊ शकले नाही. त्यामुळे ३३ टक्के महिलांना संसदेत जाण्याचा मार्ग बंद झाला. याच्या निषेधार्थ संगमनेर येथे शहर महिला शिवसेना महायुतीच्या वतीने तीव्र आंदोलन करून इंडिया आघाडीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

काँग्रेसचे युवा नेते राहुल गांधी यांच्या विरोधात महिलांनी जोरदार घोषणा बाजी करत बस स्थानक परिसर दणाणून सोडला होता. संगमनेर शहर महिला शिवसेना महायुतीच्यावतीने बसस्थानक परिसरात महिला एकत्र आल्या. या वेळी आंदोलनकर्त्या महिलांनी हातात फलक घेऊन नारीशक्तीचा अपमान अजिबात सहन केला जाणार नाही, महिलांच्या हक्कांसाठी लढा देऊ अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. महिला सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे नारी शक्ती वंदन (महिला विधेयक) असून, त्याला विरोध करणे म्हणजे महिलांच्या प्रगतीला अडथळा आणण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी तसेच संगीता पुंड यांनी करत देशातील महिलांना राजकीय व सामाजिक स्तरावर अधिक संधी मिळाव्यात, यासाठी नारीशक्ती विधेयक अत्यावश्यक आहे. मात्र काँग्रेससह इंडिया आघाडीच्या विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून या विधेयकाला विरोध होत असल्याने विधेयकाला विरोध करणाऱ्यांचा यावेळी निषेध करण्यात आला.

यावेळी लीलावती काळे, सोनाली बोटवे, पुनम दायमा, संगीता पुंड, सपना जाधव, पूजा आरगडे, आरती पगारे, शोभा सूर्यवंशी, राधा सूर्यवंशी, अरुणा सूर्यवंशी, कोमल सातपुते, स्वाती मंडलिक, शिवाली सूर्यवंशी, दिपाली वाव्हळ, शिवज्ञा आरगडे, जान्हवी जांबुकर यांच्यासह अनेक महिला व महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगमनेरमध्ये महावितरणचा 'सावळागोंधळ'

## ग्राहक अंधारात, तर कर्मचारी मोबाईलमध्ये मग्न!

युवावार्ता (प्रसाद सुतार)

संगमनेर - शहरात महावितरणचा कारभार सध्या पूर्णपणे रामभरोसे चालला असल्याचे चित्र समोर आले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय सलग ६-६ तास वीज गायब होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. मात्र या गंभीर प्रश्नावर तोडगा काढण्याऐवजी महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी ग्राहकांची थट्टा उडवण्यात मग्न असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

शहरातील महावितरणच्या तक्रार निवारण केंद्राची अवस्था तर 'असून अडचण आणि नसून खोळंबा' अशी झाली आहे. केंद्रावर तैनात असलेले कर्मचारी ग्राहकांच्या तक्रारींकडे लक्ष देण्याऐवजी तासन् तास मोबाईलवर गेम खेळण्यात किंवा सोशल मीडियात व्यस्त असल्याचे पाहायला मिळत आहे. जेव्हा हताश ग्राहक तक्रार करण्यासाठी फोन करतात किंवा केंद्रावर जातात, तेव्हा त्यांना समाधानकारक उत्तर देण्याऐवजी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. अनेक कर्मचाऱ्यांना तर शहरातील महत्त्वाच्या 'डीपी' ची तांत्रिक माहितीदेखील नसल्याचे समोर आले आहे.

शहरातील विद्यानगर भागातील परिस्थिती अत्यंत बिकट आहे. विशेषतः डॉ. नेहुलकर हॉस्पिटल परिसरात दररोज तासनतास वीज गायब असते. रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणीही वीजपुरवठा खंडित होत असल्याने रुग्णांचे आणि डॉक्टरांचे मोठे हाल होत आहेत. या भागातील नागरिक सातत्याने तक्रारी करत असूनही, अधिकारी केवळ बिलांचा भरणा करा असा तगादा लावतात, पण अखंडित वीज सेवा देण्यात सपशेल अपयशी ठरले आहेत.



छाया– प्रसाद सुतार, संगमनेर

ग्राहकांच्या प्रश्नांवर ठोस तोडगा काढण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वेळ नसल्याचे दिसते. वीज गेल्यावर विचारणा केली असता, अधिकार्यांकडून ग्राहकांची खिल्ली उडवणारे प्रकार घडत आहेत. फक्त पैसे वसुलीसाठी तत्पर असणारे प्रशासन सेवेच्या बाबतीत इतके निष्काळजी कसे असू शकते? असा संतप्त सवाल आता संगमनेरकर विचारत आहेत.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची तात्काळ दखल न घेतल्यास आणि विद्यानगर परिसरातील वीज समस्या दूर न झाल्यास, संतप्त नागरिक महावितरणच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढण्याच्या तयारीत आहेत.

# विश्वनिर्माता श्री विश्वकर्मा चौकाचे १ मे ला नामकरण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरातील अकोले बायपास रोडवरील क्रिडा संकुल ते मेडीकव्हर हॉस्पिटल चौकाला विश्वनिर्माता श्री विश्वकर्मा चौक नाव देण्याचा निर्णय संगमनेर नगरपरिषदेने घेतला होता. त्यानूसार हा नामकरण सोहळा एक मे महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

संगमनेरमध्ये विश्वनिर्माता विश्वकर्मा यांच्या नावाने यथोचित स्मारक किंवा एखाद्या महत्त्वाच्या चौकाला नाव देण्यात यावे अशी मागणी विश्वकर्मा सुतार समाज ट्रस्टच्यावतीने नगरपालिकेकडे करण्यात आली होती. त्यानुसार आ. सत्यजित तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांनी पुढाकार घेत त्यास नगरपालिका बैठकीत ठराव घेऊन २७ मार्च २०२६ रोजी मंजुरी दिली. त्यानुसार नवीन अकोले बायपास रोडवरील मेडीकव्हर हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्याला श्री विश्वकर्मा चौक असे नाव देण्यात येणार आहे. तशी तयारी देखील या ठिकाणी सुरू करण्यात आली आहे. आ. सत्यजित तांबे यांच्यासह विश्वकर्मा सुतार समाज ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी या जागेची पाहणी करून योग्य त्या सूचना दिल्या. एक मे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने या चौकाचे नामकरण करण्यात येणार आहे. या नामकरणासाठी ड. राजू खरे, देवीदास गोरे, विजय सुर्यवंशी, रमेश राजगुरू, किरण वाकचौरे, संपत सुर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवरांनी पुढाकार घेतला.



# भोंदू गडगेच्या आश्रमात वीजचोरी

## १ लाख ८६ हजारांचा दंड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील वडगाव पान येथील वादग्रस्त भोंदू महाराज राजेंद्र बापू गडगे हा फसवणूकीच्या गुन्ह्यात जेलमध्ये गेला. इकडे गुरुवारी महावितरण कंपनीने त्याच्या आश्रमात तपासणी केली असता तेथे मोठ्या प्रमाणावर वीजचोरी होत असल्याचे लक्षात आले. याप्रकरणी महावितरण कंपनीने या भोंदू बाबाला १ लाख ८६ हजार ६५० रुपयांच्या दंड ठोठावण्यात आला असून, तो न भरल्यास त्याच्यावर गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती महावितरण कंपनीच्या संगमनेर विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार यांनी दिली.

वादग्रस्त भोंदू बाबाचे एकेएक प्रकार बाहेर आल्यानंतर महावितरण कंपनीच्या भरारी पथकाने देखील एका तक्रारीची दखल घेत याठिकाणी पाहणी करून वीजचोरी पकडली होती, पथकाने तपासणी केली असता तेथे अनधिकृतपणे विजेचा वापर होत असल्याचे समोर आले होते. त्यावेळी तेथे महावितरण कंपनीचे अधिकृत मीटर असताना त्या मीटरला बायपास करून वीजचोरी होत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. वीजचोरी आढळून आलेल्या मीटरसंदर्भात १ लाख ८६ हजार ६५० रुपये वीज बिल देण्यात आले आहे, असेही कार्यकारी अभियंता वट्टमवार यांनी सांगितले.

दरम्यान श्रध्देच्या नावाखाली अनेकांची फसवणूक करणारा व पैसे उकळणारा भोंदू महाराज राजेंद्र बापू गड़गे याच्या विरोधात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मोहिम उघडली होती. परंतु या बाबानेच अंनिसवर खंडणीचे आरोप केले. त्यामुळे पोलिसांनी त्याला गजाआड केले आहे.

# महिला आरक्षण मिळेपर्यंत विरोधकांना झोपू देणार नाही - मुख्यमंत्री फडणवीस



मुंबई (वृत्तसंस्था)


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी महिला आरक्षणाच्या मुद्यावरून विरोधकांवर घणाघात केला. महिला आरक्षणाच्या मुद्यावर विरोधक खोटा प्रचार करत आहेत. ते सीरियल लायर अर्थात अट्टल खोटारडे आहेत. महिलांना हक्काचे आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आम्ही त्यांना शांतपणे झोपू देणार नाही असे ते म्हणालेत.

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी संसदेत नारी शक्ती वंदन विधेयक आणले गेले. पण हे विधेयक मंजूर होण्यासाठी आवश्यक बहुमत जमवता न आल्याने हे विधेयक लोकसभेत फेटाळले गेले. आता या मुद्यावरून भाजपने देशभरात रान पेटवले आहे. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या मुद्यावरून विरोधकांवर शरसंधान साधत आहेत. त्यांनी मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी युवाशक्ती जागर यात्रेला संबोधित करताना या प्रकरणी विरोधकांवर विशेषतः काँग्रेसवर टीकास्त्र डागले.

मुख्यमंत्री म्हणाले, भारताच्या संसदेत विरोधी पक्षांनी महिला आरक्षण विधेयकाची भ्रूणहत्या केली. त्याचा आपल्याला जागर करण्याची आवश्यकता आहे. हे विरोधक सीरियल लायर अर्थात अट्टल खोटारडे आहेत. ते रोज खोटे बोलतात. महिला आरक्षण विधेयक २०२३ मध्ये आले. ते पारित झाले. ते विधेयक केव्हा लागू झाले पाहिजे त्याची घटनादुरुस्ती सरकारने सादर केली होती. विरोधकांनी २०२३ मध्ये या विधेयकाला तोंड दाबून पाठिंबा दिला होता. पण आता त्यांच्या लक्षात आले आहे की, एनडीएकडे दोन तृतीयांश बहुमत नाही. त्यामुळे त्यांनी आपले खरे दात दाखवण्यास सुरुवात केली आहे.

विरोधकांनी संपूर्ण देशातील नारीशक्तीचा व लोकशाहीचा अपमान करण्याचे काम केले आहे. त्याचा जागर करण्याचे काम गरजेचे आहे. विरोधक सीमांकन, जनगणनेविषयी खोटे बोलत आहेत. या विधेयकाची वस्तुस्थिती व संविधानाने टाकलेली जबाबदारी काय आहे? हे अमित शहा यांनी संसदेत स्पष्ट केले. विरोधकांनी सूचवलेल्या सुधारणा एका तासात करण्याचा शब्दही दिला. पण त्यांना महिलांना आरक्षण द्यायचेच नव्हते. लोकसभेत महिला आरक्षण येऊ नये असा त्यांचा प्रयत्न आहे.






# महाराष्ट्रातील १७ लाख कर्मचारी संपावर

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रातील १७ लाख शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी २१ एप्रिलपासून अनिश्चित काळासाठी संपावर गेले आहे. त्यामुळे शासकीय सेवा, शाळा आणि महाविद्यालयांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार आपल्या अनेक प्रलंबित मागण्यांसाठी दबाव आणण्याकरिता राज्यभरातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनिश्चित काळासाठी संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हा, राज्य सरकार, निमशासकीय कर्मचारी, प्राचार्य आणि शिक्षक संघटना समन्वय समितीने जिल्हा आणि शहर सरकारी कार्यालयांमध्ये बैठका घेऊन संपाची तयारी पूर्ण केली आहे. अशी माहिती समोर आली आहे. संयोजक रावसाहेब निमसे आणि कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तालेकर यांच्या म्हणण्यानुसार, राज्यभरातील अंदाजे १७ लाख कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या संपात सहभागी झाले आहे.

संघटनांचा आरोप आहे की, सरकार गेल्या दीड वर्षांपासून कर्मचारी आणि शिक्षकांच्या अनेक मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. संघटनांचे म्हणणे आहे की, केरळसारखी राज्ये ५ लाख रुपयांपर्यंतच्या कॅशलेस आरोग्य विमा योजना देतात आणि अशीच योजना महाराष्ट्रातही लागू केली पाहिजे. या संपामुळे सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये आणि विविध विभागांच्या कामकाजावर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता आहे.

# निधीअभावी जलजीवन ठप्प, ठेकेदार मात्र रडारवर

युवावार्ता(प्रतिनिधी)-

अहिल्यानगर -केंद्र सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प ओळख म्हणून असलेल्या जलजीवन मिशनला गेल्या वर्षभरापासून निधीचे ग्रहण लागले आहे. आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील ५५६ पाणी योजनांची कामे पूर्णपणे - ठप्प झाली आहेत. निधी नसल्याने कामे बंद आहे. पण - त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सुरू केला आहे. ज्या ठेकेदारांना केलेल्या कामांचे पूर्ण बिल मिळाले आहे. पण त्यांनी पुढचे कामे मात्र बंद ठेवले आहे, असे ठेकेदार आता

रडारवर आले आहेत. दरम्यान, गेल्या वर्षभरापासून निधीच उपलब्ध होत नसल्याने आता देयकाची रक्कम १२० कोटींवर गेली आहे. ८३० पाणी योजनांपैकी २७४ योजनांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ५५६




पाणी योजनांची कामे ठप्प झाली आहे. अर्थात त्या ५५७ पाणीयोजनांपैकी बहुतांशी कामे ७५ ते ९९ या टक्केवारीमध्ये मोडतात. त्यामुळे त्या कामांना गती दिली तर ती पूर्ण होऊ शकती. त्यात बहुतांशी ठेकेदारांना त्यांनी केलेल्या कामांची पूर्ण बिले अदा करण्यात आली आहे. तरीही त्यांनी पुढील कामे सुरू केली नाही. अर्थात काम पूर्ण झाल्यानंतर बिले अदा केली जातात. मात्र काहींच्या उर्वरित ३० टक्के काम पूर्ण करणे आवश्यक आहे. असे असतांनाही त्यांनी कामे न केल्याने आता त्यांच्याकडून ही अपूर्ण कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न केले जाणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी स्पष्ट केले.

बाबतीमध्ये कामे जेवढी केली, तेवढीची बिले त्यांना अदा केल्याचे आढळून आले आहे. त्या ठेकेदारांनी पुढील कामे सुरू करणे अपेक्षित होते. परंतू त्यांनी ती कामे सुरू केली नाहीत. ७० टक्के काम पूर्ण केले. त्यांना ७० टक्के बिल देण्यात आले आहे. अर्थात त्यांनी ७० टक्के काम पूर्ण केल्याचे बिल मिळाल्यानंतर करण्यासाठी आहे. मात्र आता सुधारित ५४ पाणीयोजनांसाठी निधी मंजूर करण्यात आल्याने ही तरतूद १ हजार ४५२ कोटी रुपये झाली आहे. प्रत्येक नागरिकाला ५५ लिटर मुबलक शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, हा उद्देश समोर ठेऊन केंद्र सरकारने हा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला. २०२० पासून या उपक्रमाला सुरुवात झाली. यापूर्वी कामे पूर्ण झाली की तत्काळ बिले मिळत होती. देयके वेळेत मिळत असल्याने गतीने कामे होत होती. मात्र, वर्षभरापासून जलजीवन मिशनचा निधी मिळाला नसल्याने कोट्यवधी रुपयांची बिले अडकून पडली आहेत. जिल्ह्यात जलजीवनची ८३० कामे सुरू करण्यात आली असून या योजनेमुळे ९२७ गावांना नळाद्वारे शुद्ध पाणी मिळणार आहे. या सर्व योजनांसाठी १ हजार ३३८ कोटी निधीची तरतूद

आतापर्यंत २७४ पाणी योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित ५५६ कामे सुरू आहेत. आतापर्यंत ८९१ कोटीहून अधिक निधी ब्बहं पाणीयोजनांवर खर्च झाला आहे. २७४ पाणीयोजनांची कामे पूर्ण झाली असून आतापर्यंत अवघ्या ५४ पाणी योजना ग्रामपंचायतींना हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. जे ठेकेदार आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत. ते पाणीयोजनांची कामे कशीबशी करीत आहे. मात्र आता सर्व ठेकेदारांनी हात टकले आहे. त्यामुळे ५५६ पाणीयोजनांची कामे ठप्प आहेत. अर्थात ७६ ते ९९ टक्क्यांपर्यंत ४०३ कामे झाली आहे. या योजनांची किरकोळ कामे बाकी आहेत. पण निधी उपलब्ध नसल्याने या योजना कागदोपत्री अजूनही अपूर्ण आहेत.

# राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

## जमिनीच्या वाटणीसाठी शून्य शुल्क




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्रासाठी आता एक रुपयाही नोंदणी शुल्क भरावे लागणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला असून महसूल विभागाने तसे परिपत्रकही जारी केले आहे. या निर्णयामुळे कुटुंबांमधील जमिनीचे वाद मिटण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांचे हजारो रुपये वाचणार आहेत.

या निर्णयामुळे शेतीचे छोटे-छोटे तुकडे अधिकृतपणे नावे करणे सोपे होईल. जमिनीच्या वादातून होणारी भांडणे आणि कोर्ट-कचेऱ्यांचे फेरे कमी होतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, नोंदणी शुल्कापोटी खर्च होणारी मोठी रक्कम आता शेतकऱ्यांच्या खिशातच राहणार आहे.एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपसात जमिनीचे वाटप केल्यास नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय आम्ही घेतला होता. मात्र, दुय्यम निबंधक कार्यालयात शुल्क आकारले जात असल्याचे समोर आले. ही तांत्रिक अडचण दूर करण्यासाठी आता नवीन स्पष्टीकरण दिले आहे. आता तहसीलदारांकडे जा किंवा नोंदणी कार्यालयात, कुठेही शुल्क भरावे लागणार नाही. याचा फायदा राज्यातील प्रत्येक शेतकरी कुटुंबाला होईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे. एकूणच या निर्णयाचा राज्यातील अनेक शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल. यापूर्वी केवळ तहसीलदारांकडे (कलम ८५ अंतर्गत) होणाऱ्या वाटणीपत्रांनाच शुल्कातून सवलत होती. अनेक शेतकरी थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी जात होते. तिथे स्पष्ट नियमावली नसल्याने अधिकारी नोंदणी शुल्क आकारत होते. आता तहसीलदारांकडे जा किंवा थेट दुय्यम निबंधक कार्यालयात; दोन्ही ठिकाणी नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. एकाच कुटुंबातील रक्ताच्या नात्यातील सदस्यांमध्ये होणाऱ्या सर्व वाटणीपत्रांना हा नियम लागू राहील.

# कोंची शिवारात घरफोडी

## ५० हजारांची रोकड लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून, पोलिसांना आव्हान देत चोऱ्यांचे सत्र सुरूच ठेवले आहे. सोमवारी (दि.२०) पहाटे कोंची शिवारात चोरट्यांनी एका घरावर डल्ला मारत ५० बाते ५५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. सतत होणाऱ्या या धाडसी चोऱ्यांमुळे संपूर्ण पंचक्रोशीत दहशतीचे सावट पसरले असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

कोंची शिवारातील गिरी वस्ती (गोसावी वस्ती येथे सोमवारी पहाटे चोरट्यांनी अमोल मोहन गिरी यांच्या घरात प्रवेश केला घरातील सामानाची उचकोषाचक करून ५० ते ५५ हजार रुपयांची रोकड आणि महत्त्वाचे कागदपत्रे चोरून नेली. तसेच चोरट्यांनी परिसरातील इतर एक-दोन ठिकाणीही हात मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, नागरिकांना जाग आल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी तिथून पळ काढला. याबाबत मात्र, अद्याप कोणतीही तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेली नाही. नुकताच उंबरी बाळापूर आणि आश्वी येथे चोरट्यांनी दोन ते तीन ठिकाणी धुमाकूळ घातला होता. एका वृध्द महिलेला जखमी करून सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली होती. त्यामुळे या चोरांच्या टोळीचा छडा लावण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. दरम्यान, यापूर्वी परिसरात झालेल्या चोऱ्यांचा तपास अद्याप लागलेला नसताना उंबरी बाळापूर, आश्वी येथील घटनेनंतर तरी पोलीस या चोरट्यांच्या मुसक्या आवळणार का? की सामान्य जनतेला अशाच दहशतीच्या सावटाखाली राहावे लागणार? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# अशोक खरातचा नवा घोटाळा उघड

## ३२ बनावट खात्यांतून ५७ लाखांची अफरातफर

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिक जिल्ह्यात स्वतःला आध्यात्मिक गुरु म्हणून मिरवणाऱ्या अशोक खरातच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. आधीच विविध गंभीर आरोपांना सामोरे जात असताना आता त्याच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहाराचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. सिन्नर येथील जगदंबा ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेत एका व्यक्तीच्या नावाचा गैरवापर करून ३२ बनावट खाती उघडण्यात आल्याचे उघड झाले आहे. या खात्यांच्या माध्यमातून सुमारे ५७ लाख ९० हजार ९७९ रुपयांची अफरातफर करण्यात आल्याचा आरोप असून या प्रकरणी पोलिसांनी नवीन गुन्हा नोंदवला आहे.



या प्रकरणाचा कालावधी २०१६ ते २०२३ असा असल्याची माहिती समोर आली आहे. तक्रारदाराच्या परवानगीशिवाय त्यांच्या नावावर ही खाती उघडण्यात आली होती. संबंधित खात्यांद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करण्यात आले आणि त्यातून मोठी रक्कम वळवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे. या प्रकारामुळे पतसंस्थेच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून व्यवस्थापनाची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. पोलिसांनी अशोक खरातसह संबंधित व्यवस्थापनावर फसवणुकीचे गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान, या प्रकरणात सक्तवसुली संचालनालयानेही (ईडी) लक्ष घातले आहे. काही दिवसांपूर्वी ईडीने जगदंबा पतसंस्थेवर छापा टाकून महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेतली होती. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहारांचे पुरावे मिळाल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर ईडीने मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा नोंदवत तपासाचा फास आणखी आवळला आहे. त्यामुळे केवळ स्थानिक पातळीवरच नव्हे, तर केंद्रीय यंत्रणाही या प्रकरणात सक्रिय झाल्या आहेत.

# रुपया स्थिरतेकडे; RBI ने डीलर्सना दिली मोकळीक



मुंबई (वृत्तसंस्था)

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणजेच आरबीआय ने २० एप्रिल रोजी रुपयाची अस्थिरता रोखण्यासाठी परकीय चलन डीलर्स (फॉरेक्स डीलर्स) वर लादलेले काही निर्बंध मागे घेतले आहेत. आता डीलर्स ऑफशोर नॉन-डेलिवरेबल फॉरवर्ड मार्केटमध्ये पुन्हा पोझिशन्स घेऊ शकतील.

आरबीआयने हे पाऊल उचलण्यापूर्वी काही दिवसांपूर्वीच गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी संकेत दिले होते की, हे निर्बंध अनिश्चित काळासाठी लागू राहणार नाहीत. केंद्रीय बँकेने स्पष्ट केले आहे की, अधिकृत डीलर्सना (ऑथोराइज्ड डीलर्स) आता निवासी किंवा अनिवासी वापरकर्त्यांना रुपयाशी संबंधित नॉन-डेलिवरेबल डेरिव्हेटिव्ह कॉन्ट्रॅक्ट्स ऑफर करण्यापासून रोखण्याची गरज नाही.नवीन नियमांनुसार, बँका आता वापरकर्त्यांना रुपयाशी संबंधित कोणताही परकीय चलन डेरिव्हेटिव्ह करार पुन्हा बुक करण्याची परवानगी देखील देऊ शकतात. हा निर्णय तात्काळ प्रभावाने लागू झाला आहे.

तथापि, आरबीआयने स्पष्ट केले आहे की अधिकृत डीलर्सना संबंधित पक्षांसोबत रुपयामध्ये फॉरेन एक्सचेंज डेरिव्हेटिव्ह करार करण्याची परवानगी नसेल. बंधित पक्षांच्या बाबतीत सवलत केवळ सध्याचे करार रद्द करणे किंवा रोलओव्हर करणे आणि नॉन-रिलेटेड, नॉन-रेसिडेंट युजर्ससोबत केलेले बॅक-टू-बॅक व्यवहार करण्यापुरतीच मर्यादित आहे. यासोबतच, बँकांना प्रत्येक व्यावसायिक दिवसाच्या शेवटी ऑनशोर डिलिव्हरेबल रुपया मार्केटमध्ये आपली नेट ओपन पोझिशन १० कोटी डॉलर (१०० दशलक्ष डॉलर) पर्यंत मर्यादित ठेवावी लागेल. मार्चच्या शेवटी अमेरिका-इराण युद्धाच्या वाढत्या तणावामुळे ब्रेंट क्रूडच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्या होत्या. यामुळे रुपया आपल्या विक्रमी नीचांकी पातळीकडे घसरत होता, हे रोखण्यासाठी केंद्रीय बँकेने अनेक कठोर पावले उचलली होती. १० एप्रिलपर्यंत बँकांनी ऑफशोर एनडीएफ मार्केटमध्ये सुमारे ४० अब्ज डॉलरचे सट्टेबाजीचे व्यवहार बंद केले होते. आरबीआयच्या या कठोर उपायांनंतर रुपया डॉलरच्या तुलनेत ९५.२१ च्या विक्रमी नीचांकी पातळीवरून परत सावरला आहे.

# राजस्थानी ब्राह्मण समाज अध्यक्षपदी आसोपा तर उपाध्यक्षपदी ओझा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजस्थानी छन्याती ब्राह्मण जगदीश मंदिर ट्रस्टच्या कार्यकारी मंडळाचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळाची बैठक दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत विविध पदांवरील बदल एकमताने करण्यात आले.





या बैठकीत विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपदीराजेश जगदीशजी आसोपा यांची, तर उपाध्यक्षपदी नितीन नंदलालजी ओझा यांची एकमताने निवड करण्यात आली. स्व. सुरेश काका जोशी यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदासाठी हा निर्णय घेण्यात आला. तसेच याच बैठकीत जगदीश मंदिर निर्माण समितीची स्थापना करण्यात आली असून समितीच्या अध्यक्षपदी अभिजीत सुरेशचंद्रजी जोशी यांची निवड करण्यात आली. संगमनेर येथील राजस्थानी ब्राह्मण समाजाचे हे पुरातन मंदिर असून त्याच्या जीर्णोद्धाराचे काम सध्या सुरू आहे. सदर काम अधिक गतीने व नियोजनबद्ध पद्धतीने पूर्णत्वास नेण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला. या बैठकीस विश्वस्त मंडळाचे खजिनदार ओंकार तिवारी, सचिव मनोज साकी तसेच सदस्य सतीश खंडेलवाल, रवी जोशी, ओंकार जोशी, श्यामसुंदर जोशी, कैलास पंचारिया, नरेंद्र ओझा आणि श्रीमती राजेश्वरी ओझा उपस्थित होते.

# राज्यातील 9 आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई (वृत्तसंस्था)

आयपीएस अधिकारी तुषार दोषी यांची साताराच्या पोलीस अधिक्षक पदावरून सांगलीचे पोलीस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत पालकमंत्री शंभुराजे देसाई यांना सातारा पोलीसांकडून मारहाण झाल्याचा आणि पोलिसांच्या मदतीने भाजपने जिल्हा परिषदेची सत्ता काबीज केल्याचा आरोप महायुतीतील सत्ताधारी असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला होता. त्यानंतर विधिमंडळात विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी तुषार दोषी यांच्यावर कारवाईची शिफारस केली होती.

एका अर्थाने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून तुषार दोषी यांची बदली हा प्रतिष्ठेचा विषय करण्यात आला होता. अखेर शिंदेंच्या शिवसेनेच्या नाराजीची दखल घेतल्याच दाखवत तुषार दोषी यांची बदली करण्यात आली आहे.तुषार दोषींच्या जागी पुणे क्राईम ब्रांचचे पोलीस उपायुक्त असलेल्या निखिल पिंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निखिल पिंगळे यांच्यावरही रोहिणी खडसे यांचे पती खेवलकर पार्टी प्रकरणी आरोप करण्यात आले होते. तुषार दोशी यांच्यासह राज्यातील नऊ आयपीएस अधिकाऱ्यांच्या काल (सोमवारी, ता २०) बदल्या करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीत वादग्रस्त ठरलेले सातारचे पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांची बदली सांगलीत करण्यात आली आहे.

# सरकारी नोकरीसाठी अनुभव अनिवार्य, सर्वोच्च न्यायालय



मुंबई (वृत्तसंस्था)

सरकारी नोकरीसाठी केवळ उच्च शैक्षणिक पदवी असणे पुरेसे नाही, तर भरती नियमांनुसार आवश्यक असलेला कामाचा अनुभव असणेही तितकेच अनिवार्य आहे असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला. आवश्यक अनुभव नसताना केवळ उच्च शिक्षणाच्या जोरावर एखाद्या उमेदवाराला पात्र ठरवणे बेकायदा असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाचे निरीक्षणभरती आणि पदोन्नती नियमांनुसार आवश्यक असलेला अनुभव नसेल, तर केवळ उच्च पदवीच्या जोरावर उमेदवार 'पात्र' ठरू शकत नाही. उच्च पदवी हे निवडीसाठी एक 'प्राधान्य' असू शकते, परंतु ते 'अत्यावश्यक' पात्रतेची जागा घेऊ शकत नाही. नेमके प्रकरण काय? तरुणीला फटकाहिमाचल प्रदेश शालेय शिक्षण मंडळाने 'कॉम्प्युटर हार्डवेअर इंजिनिअर' पदासाठी राबवलेल्या भरती प्रक्रियेवर न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. ए. एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने ताशेरे ओढले. या प्रकरणात एका तरुणीची निवड करण्यात आली होती, जिच्याकडे 'इलेक्ट्रॉनिक्स व कम्युनिकेशन'मध्ये एम.टेक. ही उच्च पदवी होती. मात्र नियमांनुसार आवश्यक असलेला ५ वर्षांचा कामाचा अनुभव तिच्याकडे नव्हता. ही निवड नियमांनाच हरताळ फासणारी मूळ पात्रता निकष पूर्ण न करता उच्च पदवीच्या आधारे सवलत देणे कायदेशीररीत्या चुकीचे आहे. अशा प्रकारे केलेली निवड ही प्रशासकीय चूक नसून ती पात्रतेच्या मूळ नियमांनाच हरताळ फासणारी आहे. निवड प्रक्रियाच दोषपूर्ण आढळल्यास, त्या उमेदवाराची निवड रद्द करणे हाच योग्य मार्ग असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

# खरिप हंगामापूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार - मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांना दिलासा देणे ही केवळ घोषणा नसून ती आमची बांधिलकी आहे. खरिप हंगामापूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार असून जे शेतकरी प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याचीही आम्ही पूर्ण काळजी घेत आहोत. पुढील चार महिन्यांत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिवसा वीज आणि मोफत वीज देण्याचा शासनाचा मानस असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणाबाबत बोलताना, लाडकी बहिण सारख्या योजना आम्ही सुरू केल्या आहेत. काहींना वाटले की आम्हाला मोठे बहुमत मिळाल्यावर या योजना बंद होतील, या योजना कधीही बंद होणार नाहीत. त्या अधिक प्रभावीपणे सुरू राहतील.लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी महिलांचा सहभाग वाढवणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच संसद आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. मात्र, दुर्दैवाने काही राजकीय पक्षांनी सुरुवातीला समर्थन देऊन नंतर विरोध केला, ज्यामुळे हा ऐतिहासिक निर्णय पूर्णत्वास जाऊ शकला नाही. हे अत्यंत खेदजनक आहे. आज आपण महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षात आहोत. त्यांनी आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षण, स्त्रीसन्मान आणि सामाजिक न्यायासाठी जे महान कार्य केले, ते आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी समाजातील अनेक वाईट प्रथांना समाप्त करण्यासाठी लढा दिला आणि स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडली. आज आपली जबाबदारी आहे की त्यांच्या विचारांना पुढे नेणे, समाजात समानता प्रस्थापित करणे आणि प्रत्येक घटकाला न्याय देणे.



समुद्रात वाहुन जाणारे ७५ टीएमसी पाणी अहिल्यानगर, नासिक व मराठवाड्याच्या प्रत्येक तालुक्यात पोहचवून दुष्काळमुक्त करण्याचा प्रयत्न करणार असून मुळाधरणाचा गाळ उपासल्यास ३ टीएमसी आधिकचा पाणीसाठा तयार होणार आहे. त्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. राहुरी विद्यापीठाला भविष्यात लागेल एवढी जमिन ठेऊन उरलेली एक हजार एकर जमिन औद्योगिक वसाहतीसाठी घेण्यासाठी प्रयत्न करणार असून संरक्षण प्रकल्पासाठी या जिल्ह्यात जागा आपण देत आहोत. त्यामुळे या भागातील जवळपास ३५ हजार बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे. या भागातील एसटी डेपो, रेल्वेप्रश्न अशा अनेक मागण्या आपण पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# हातात संविधान व घोड्यावर बसून वधूची लग्नमंडपात एन्ट्री

## निमगाव जाळीत परिवर्तनवादी लग्न सोहळा उत्साहात

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

विविध धर्मातील पाच धर्मगुरू समवेत हातात संविधान घेऊन वधूचा घोड्यावर बसून लग्न मंडपात प्रवेश, आणि उपस्थित सजग जनसमुदाय संविधानाच्या साक्षीने संगमनेर तालुक्यातील निमगाव जाळी येथे विश्वदीप वाघमारे आणि विदिशा मुन्तोडे या नवदाम्पत्याचा लग्न सोहळा मोठ्या थाटात पार पडला. तालुक्यातील कोंची येथील नालंदा बौद्ध आश्रमाचे प्रमुख धर्मगुरू महाबोधी करुणानंद बोधी यांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वदीप व शिबलापूर येथील दिवंगत रविंद्र राजू मुन्तोडे यांची कन्या विदिशा यांच्या लग्न सोहळ्यासाठी राजकीय, धार्मिक, शासकीय सेवेतील आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. भारतीय संविधानामुळे आज महिलांना जगण्याचा अधिकार मिळाला, महिलांचा गौरव व्हावा म्हणून आदर्श बौद्ध नववधू विदिशा हिने घोड्यावर बसून हातात भारतीय संविधान उद्देशिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा सोबत घेऊन आदर्श दिला, असाच सर्वांच्या भाषणाचा सुर होता. यावेळी ड. किरण रोहम, परिमल निकम, रमणलाल शिंगवी, अर्चना राम गायकवाड, चरण त्रिभुवन, शिवाभाऊ साठे, प्रदीप थोरात, नाथा आल्हाट, संदीप खरात, विनोद गायकवाड, रमेश रूपवते, फिरोजशहा पठाण, बंटी यादव, सचिन साळवे उपस्थित होते.

# झेडपी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे वेळापत्रक जाहीर

## पंचायत समिती पातळीवरही लवकरच प्रक्रिया

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जिल्हा पातळीवर सर्वांना प्रतिक्षा असणाऱ्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. यात झेडपी सामान्य प्रशासन विभाग ६ पासून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सुरू करणार असून, ८ मे पर्यंत ती पूर्ण करण्यात येणार आहे. दरम्यान, जिल्हा पातळीवर बदल्या पूर्ण झाल्यावर १८ ते २२ मे या कालावधीत पंचायत समिती पातळीवरील कर्मचाऱ्यांच्या बदल्या पूर्ण करण्यात याव्यात, असे आदेश काढण्यात आले आहेत.

यंदा जनगणनेची कार्यवाही करण्यात येणार येणार असल्याने, जिल्हा परिषदेच्या वर्ग क व ड या प्रवर्गातील शिक्षक, ग्रामसेवक आणि जनगणनेच्या कामासाठी नेमणूक झालेले कर्मचारी वगळून उर्वरित उर्वरित कर्मचाऱ्यांची बदलीची प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाने बदली प्रक्रियेचे वेळापत्रक तयार करून ते प्रसिद्ध केले आहे. यात ६ मे रोजी सकाळी सर्वप्रथम कृषी विभागातील कर्मचारी, त्यानंतर महिला बालकल्याण, ग्रामीण पाणी पुरवठा, त्यानंतर दुपारी बांधकाम, शिक्षण, अर्थ आणि सायंकाळी सामान्य प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या दिवशी ७ मे रोजी सकाळी सर्वप्रथम पशूसंवर्धन विभाग, त्यानंतर आरोग्य विभाग, तर ८ मे रोजी जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदलींची प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.




दरम्यान, या बदल्यांसाठी जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करावी. प्रशासकीय व विनंती बदलीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची, तसेच बदली धोरणात सूट मिळावी यासाठी विनंती केलेल्या कर्मचाऱ्यांची आवश्यक कागदपत्रांची खातरजमा संबंधित विभाग प्रमुखांनी करावी. ३१ मार्चअखेर मंजूर, भरलेली व रिक्त पदांचा अहवाल तसेच प्रशासकीय बदलीने रिक्त होणारी पदे बदल्यापूर्वी दोन दिवस आधी प्रसिद्ध करण्यात यावीत. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागातील रिक्त पदांचा अहवाल त्यात्या विभागाचे प्रमुख व गटविकास अधिकारी यांच्यावर राहणार आहे. अपंग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी, तसेच संबंधित प्रमाणपत्राची ऑनलाईन नोंद आहे की नाही, याची पडताळणी खाते प्रमुखांनी करावी, अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांनी केल्या आहेत.

बदली प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास, त्यास संबंधित खाते प्रमुख गटविकास अधिकारी यांना व्यक्तीः जबाबदार धरण्यात येईल. यांची गंभीरपणे नोंद घेऊन बदली प्रक्रिया संपल्यावर तात्काळ इतिवृत्त व बदली आदेश त्याच दिवशी काढण्याचे सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी काढले आहेत.

VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta







मा. श्री. सुभाष कोथमिरे
संचालक
कोथमिरे मसाले



डॉ. नितिन जठार
चैतन्य हॉस्पिटल, संगमनेर



मा. श्री. देविदास गोरे
चेअरमन,
विश्वकर्मा नागरी पतसंस्था, संगमनेर



मा. श्री. राजेंद्रजी सोमाणी
राजेंद्र उद्योग
समुहाचे संचालक



मा. श्री. अतुल अभंग
संचालक
ए एस फिटनेस स्टुडिओ

२१ एप्रिल

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता


# शरद पवार ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल



मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ते सध्या मुंबई स्थित ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल आहेत. तिथे त्यांच्या काही टेस्ट सुरू आहेत. त्या झाल्यानंतरच त्यांच्या प्रकृतीविषयीची स्पष्टता येईल, असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे शरद पवार यांना मागील महिन्यातच पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

मंगळवारी बारामती व राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बारामतीत सांगता सभा झाली. या सभेला महाविकास आघाडीतर्फे स्वतः सुप्रिया सुळे हजर राहणार होत्या. स्वतः सुनेत्रा पवार यांनी त्यांना सभेचे निमंत्रण दिले होते. या सभेची माहिती देताना सुप्रिया सुळे यांनी शरद पवारांच्या प्रकृतीची उपरोक्त माहिती दिली. त्या म्हणाल्या, शरद पवार या सांगता सभेला उपस्थित राहिले नाहीत. कारण, ते ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल आहेत. तिथे त्यांच्या काही टेस्ट सुरू आहेत. त्या झाल्यानंतरच याविषयीची स्पष्टता येईल. सुप्रिया सुळे म्हणाल्या, त्यांनी मला कुटुंब म्हणून प्रचाराला येण्याचे निमंत्रण दिले होते. कारण, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सर्वप्रथम ही निवडणूक बिनविरोध व्हावी असा निर्णय घेतला होता. आम्ही पहिली भूमिका मांडली. त्यानंतर काँग्रेस व उद्धव ठाकरे यांनीही सहकार्याचीच भूमिका घेतली.

# जिजामाता स्कूलमध्ये उन्हाळी शिबिरात मुलांची धमाल



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

कै. शंकरराव शेवाळे पाटील ट्रस्ट संचलित जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी उन्हाळी बालसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आनंद, उत्साह आणि सकारात्मक उर्जेने भरलेल्या वातावरणात दिवसाची सुरुवात होत, संस्कृत श्लोक व जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या दिवशी आईस्क्रीम कँडी तयार करणे, ब्लॉक्सपासून मनोरा उभारणे आणि होडी तयार करणे अशा आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत, सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि एकाग्रतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

शिबिराच्या माध्यमातून मुलांचा सर्वांगीण विकास साधणे, आत्मविश्वास वाढवणे आणि सहकार्याची भावना विकसित करणे हा उद्देश असून, त्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. कार्यक्रमाचा समारोप मुलांनी सकस व पौष्टिक आहाराचा आस्वाद घेत आनंदात केला.

# तामिळनाडूत भाजपला खाते उघडणे कठीण

चेन्नई (वार्ताहर)-

तमिळनाडू राज्यातील २३४ जागांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून, सत्तास्थापनेसाठी ११८ जागांची आवश्यकता आहे. राज्यात मुख्य लढत डीएमके आणि एआयएडीएमके यांच्यात रंगत आहे. एकीकडे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे द्रविडीयन मॉडेल आणि विविध लोकप्रिय योजना आहेत, तर दुसरीकडे जयललितांचा वारसा सांभाळणारी एआयएडीएमके आणि भारतीय जनता पक्ष युती हिंदुत्वाच्या मुद्द्यावर आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

निवडणूक कव्हरेजदरम्यान चेन्नई, वेल्लोर, तिरुपूर, मदुराई, रामनाथपुरम आणि त्रिची या भागांतील पाहणी व स्थानिकांशी संवादातून काही महत्त्वाचे अंदाज समोर आले आहेत. पहिल्या अंदाजानुसार, डीएमके आघाडीला १२० ते १४० जागा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामध्ये डीएमकेला १०० ते ११०, तर काँग्रेसला १० ते १५ जागा मिळू शकतात. इतर सहयोगी पक्षांनाही १० ते १५ जागा मिळण्याचा अंदाज आहे. २०२१ च्या निवडणुकीत डीएमके आघाडीने १५९ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले होते.

दुसरीकडे, एआयएडीएमके आघाडीला ९० ते १०० जागा मिळण्याची शक्यता आहे. एआयएडीएमकेला ७० ते ८० जागा मिळू शकतात, तर २७ जागांवर लढणाऱ्या भाजपला ५ पर्यंत जागा मिळू शकतात. कोईम्बतूर दक्षिण, तिरुनेलवेली, नागरकोइल, मोडाकुरिची आणि कारैकुडी या मतदारसंघांमध्ये भाजपला काही प्रमाणात संधी असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, तमिळ चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार थलापती विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम या नव्या पक्षाची एंट्री मात्र अपेक्षेइतकी प्रभावी ठरताना दिसत नाही. या पक्षाला ५ ते १५ जागा मिळण्याची शक्यता असून सुमारे १२ टक्के मतांचा वाटा मिळू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. एकूणच, या निवडणुकीत सत्ताधारी डीएमके आघाडी आघाडीवर असल्याचे चित्र असले, तरी एआयएडीएमके आणि भाजप युतीकडून जोरदार टक्कर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दहावीच्या गुणवंतांचा गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील नामांकित स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलमधील इयत्ता दहावीच्या सी. बी. एस. ई. परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा विद्यालयाच्या 'एव्ही रूम'मध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या अध्यक्षा डॉ. संज्योत वैद्य, अजित दादा काकडे, प्राचार्य रमेश दिघे आणि मान्यवर पालकांनी दीपप्रज्वलन करून सोहळ्याचा शुभारंभ केला. विद्यार्थ्यांच्या कष्टाचे चीज व्हावे आणि त्यांच्या यशाचा गौरव व्हावा या हेतूने या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी यशाचा उच्चांक प्रस्थापित करणाऱ्या गुणवंतांचा डॉ. संज्योत वैद्य यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी स्वरा सुवर्णा बाळासाहेब मेहेत्रे (९७.२%) आणि स्वरूपा दीपिका योगेश थोरात (९७.२%), द्वितीय क्रमांकाचा मानकरी सामर्थ्य संज्योत अरविंद वैद्य (९६.८%) तसेच तृतीय क्रमांकाची मानकरी नमिता ज्योती नितिन दिघे (९६.४%) यांचा समावेश होता. या प्रमुख यशवंतांनंतर, परीक्षेत घवघवीत यश मिळवलेल्या इतर सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

आपल्या यशाचे गुपित उलगडताना स्वरूपा दीपिका योगेश थोरात (९७.२%) म्हणाली की, हे यश माझ्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणि माझ्या शिक्षकांनी व पालकांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचे फळ आहे. स्वरा सुवर्णा बाळासाहेब मेहेत्रे (९७.२%) हिने आपल्या भाषणात सांगितले की, कोणत्याही प्रकारचे यश मिळवण्यासाठी स्वतःवर आत्मविश्वास आणि कामात चिकाटी असणे अत्यंत आवश्यक आहे. सामर्थ्य संज्योत अरविंद वैद्य (९६.८%) याने इतर विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला की, दुसऱ्याचे वेळापत्रक फॉलो करण्यापेक्षा स्वतःच्या स्वभावानुसार स्वतःचे वेळापत्रक तयार करा, तरच तुम्ही निराश न होता ध्येय गाठू शकाल. तसेच, युवराज वैशाली संदेश चोपडे याने आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शाळेने दिलेले प्रोत्साहन आणि योग्य मार्गदर्शनामुळेच आम्ही हे शिखर गाठू शकलो आहोत.

यावेळी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना डॉ. संज्योत वैद्य म्हणाल्या की, या बॅचच्या विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच नव्हे, तर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आणि इतर उपक्रमांतही हिरिरीने भाग घेऊन स्वतःला सिद्ध केले आहे. पालकांच्या वतीने आपल्या भावना व्यक्त करताना सुरेश घोरपडे म्हणाले की, या सर्व यशाचे श्रेय स्ट्रॉबेरी स्कूलचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या अपार कष्टांना जाते.

# रमेश मोरे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी पदवी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डॉ. रमेश हरिभाऊ मोरे यांना व्यवस्थापन शाखेतून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. रमेश मोरे यांनी Role Of Professional Educational Institutions In Employment Generation Entreprenurship Development With Reference To Ahilyanagar Nashik District. या विषयावर डॉ. संदीप निंबाळकर यांचे मार्गदर्शना खाली आपला प्रबंध सादर केला.



सदरचा प्रबंध इंजिनिअरिंग कॉलेज, फार्मसी व एम.बी.ए कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी खूपच उपयुक्त असून व्यवसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थानी नोकरी व स्वयंरोजगार वाढविण्यासाठी नक्की काय केले पाहिजे ? यावर हा प्रबंध मार्गदर्शन करतो. या प्रबंधामधील शोध व संदेश यांच्या माध्यमातुन स्वायत्त शिक्षण देणाऱ्या संस्थांना त्यांचे अभ्यासक्रम बदलण्यास भाग पाडले जाणार असून त्यामधुन त्यांना नोकरीस व स्वयंरोजगारास योग्य असे अभ्यासक्रमात तयार करावे लागणार आहे. यामधुन देशाच्या विकासाला देखिल चालना मिळणार आहे.

सदरचा प्रबंध तयार करण्यासाठी डॉ. रमेश मोरे यांना अनेक शिक्षण तज्ञांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांचे या शोध कार्यासाठी अमृतवाहिनी संस्थेचे अध्यक्ष मा. आ. बाळासाहेब थोरात, कार्यकारी विश्वस्त सौ.शरयुताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, डायरेक्टर केडेमिक डॉ. जे. बी. गुरव, डॉ. बाबा लोंढे तसेच अमृतवाहिनी शिक्षण संकुलातील विविध प्राचार्यांनी त्यांचे कौतुक केले आहे. व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. दैनिक युवावार्ता परिवाराकडून त्यांचे अभिनंदन.

# संपादकीय...

## वसुंधरेचे रक्षण हीच खरी जबाबदारी

दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो, मात्र हा केवळ दिनविशेष नसून पृथ्वीवरील जीवनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली एक गंभीर जाणीव आहे. मानवाने विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अभूतपूर्व विकास साधला, परंतु या विकासाच्या बदल्यात पृथ्वीच्या संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास आणि जलसंकट यांसारख्या समस्या आज संपूर्ण जगाला वेढून टाकत आहेत. अशा परिस्थितीत वसुंधरा दिन हा केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस म्हणून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. पृथ्वी ही आपली केवळ राहण्याची जागा नसून ती आपली 'आई' आहे, जी आपल्याला अन्न, पाणी, हवा आणि जीवन देते, त्यामुळे तिच्या रक्षणाची जबाबदारी ही प्रत्येकाची नैतिक कर्तव्य ठरते. १९७० साली सुरू झालेला वसुंधरा दिन आज जागतिक स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण चळवळ बनला आहे, परंतु केवळ एक दिवस साजरा करून पर्यावरण वाचणार नाही, तर हा विचार आपल्या दैनंदिन जीवनात रुजवणे गरजेचे आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकाने वापर होत असून जंगलांची तोड, नद्यांचे प्रदूषण आणि हवेत विषारी वायूंची वाढ यामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. 'जागतिक तापमानवाढ' ही केवळ संकल्पना नसून ती आज वास्तव बनली आहे, ज्यामुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाणही वाढत आहे. हवामान बदलामुळे पावसाचे चक्र विस्कळीत झाले असून काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत दुष्काळाची स्थिती निर्माण होत आहे, ज्याचा थेट परिणाम कृषी क्षेत्रावर होऊन अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासामागे मानवी हस्तक्षेप हे प्रमुख कारण असून 'विकास' या नावाखाली आपण निसर्गाचा विनाश करत आहोत, मोठमोठे प्रकल्प, धरणे आणि औद्योगिक विस्तार यासाठी जंगलांचा बळी दिला जात आहे, नद्या वळवल्या जात आहेत आणि पर्वत उध्वस्त केले जात आहेत. या सर्व प्रक्रियांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून त्याचे दुष्परिणाम शेवटी मानवालाच भोगावे लागत आहेत, त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये समतोल साधणे अत्यावश्यक आहे. 'शाश्वत विकास' ही संकल्पना याच पार्श्वभूमीवर महत्त्वाची ठरते, ज्यामध्ये वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या हक्कांवर गदा येणार नाही याची काळजी घेतली जाते. नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर, नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब, कचऱ्याचे पुनर्चक्रण आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या उपाययोजना या दिशेने महत्त्वाच्या ठरतात. जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवनाचा पाया असून विविध वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो, परंतु मानवी क्रियांमुळे अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत, त्यामुळे जंगलांचे संवर्धन आणि वन्यजीवांचे संरक्षण यावर भर देणे गरजेचे आहे. जलसंकट हीदेखील गंभीर समस्या बनली असून पाण्याचा अतिरेकाने वापर, जलप्रदूषण आणि पावसाच्या पाण्याचे अपुरे व्यवस्थापन यामुळे जलस्रोत आटत आहेत, त्यामुळे पाणी वाचवणे आणि जलसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे. याचबरोबर प्लास्टिकचा वाढता वापर हा पर्यावरणासाठी मोठा धोका ठरत असून 'कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा' हा मंत्र अंगीकारणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धनात शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून लहानपणापासूनच पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. शासनाने पर्यावरणपूरक धोरणे राबवणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कठोर नियम लागू करणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणे आवश्यक असले, तरी प्रत्येक नागरिकानेही आपल्या स्तरावर प्रयत्न करणे तितकेच गरजेचे आहे. आज तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातून सौर ऊर्जा, वारा ऊर्जा आणि जल ऊर्जा यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवून पर्यावरणावरचा ताण कमी करता येऊ शकतो. वसुंधरा दिनाच्या निमित्ताने झाडे लावणे, पाणी वाचवणे, कचरा कमी करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यांसारखे छोटे-छोटे संकल्पही मोठा बदल घडवू शकतात. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता पर्यावरणीय समस्या या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटकांशी निगडित असून संसाधनांचे असमान वितरण आणि वाढती विषमता यामुळे पर्यावरणावरचा ताण वाढतो, त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी समग्र दृष्टिकोन आवश्यक आहे. शेवटी, पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून आपण तिचे केवळ पालक आहोत.

# सावरगाव तळची सलोनी जिद्दीच्या जोरावर बनली पोलीस

## पोलीस पदापर्यंत ना थांबता उच्च पदापर्यंत जावे - सौ. खताळ



संगमनेर (प्रतिनिधी)- अपयश आले तरी खचून न जाता, अत्यंत जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर सलोनी वाघमारे ही पोलीस दलात पोहोचली आहे, परंतु तिने पोलीस कर्मचारी पदावरच न थांबता पुढे स्पर्धा परीक्षा देऊन उच्चपदापर्यंत पोहोचावे, असा सल्ला आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळे यांनी दिला.

संगमनेर तालुक्यातील सावरगावतळ येथील कु. सलोनी दयानंद वाघमारे हिने पोलीस भरती परीक्षेमध्ये यश मिळवत ठाणे शहर पोलीस दलात स्थान मिळवले आहे. तिच्या कुटुंबियांच्या तसेच ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात सौ. खताळ बोलत होत्या. या कार्यक्रमाला सावरगावतळचे माजी उपसरपंच बाळासाहेब शेटे, सह्याद्री अॅकॅडमीचे प्रमुख अमोल रहाणे, बाजार समितीचे माजी संचालक सुधीर वाघमारे, सलोनीचे आजोबा दादाभाऊ वाघमारे, जिल्हा परिषद शिक्षक कैलास वाघमारे, जयश्री वाघमारे, डॉ. प्रमोद पावसे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सौ. खताळ म्हणाल्या की, गावातील मुलामुलींनी जिद्दीने यश मिळवत आहे, मात्र त्यांच्या वस्तीपर्यंत जाणारे रस्ते खराब आहेत. जर तरुण इतकी मेहनत करत असतील, तर आपण ग्रामस्थांनी सुद्धा रस्त्यांसाठी पुढाकार घ्यायला हवा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, पण तुमची साथ आम्हाला असणे गरजेचे आहे, असे सांगून त्या म्हणाल्या की, सलोनीला तिच्या आई-वडील, आजी-आजोबा व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे. तिच्याकडून त्यांनाही ती मोठ्या पदावर जावो आणि कुटुंबाचं, गावाचं नाव मोठं करो, अशा अपेक्षा आहेत. असा आशावाद सौ. खताळ यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन कैलास वाघमारे यांनी करून उपस्थितांचे आभार मानले.

### महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.**
**सा. बां. विद्युत विभाग, २ रा मजला, ग्रीन बिल्डींग, सा. बां. परिसर.**
**ऊंडवाडी रोड, नाशिक – ४२२००२**
**दुरध्वनी क्रमांक ०२५३–२५७८०१२**
Email - elnashik.ee@mahapwd.gov.in

कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, नाशिक हे महाराष्ट्र शासनाकडील खालील प्रमाणे रकाना क्रमांक ६ मध्ये नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत, निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | निविदा संचाची फी | ठेकेदाराचा वर्ग | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Est No. 5279/25-26 Providing Trensformer Substation For Power Supply To 50 Judges Residential Quarters, At Nyayanagar, Tal & Dst. Ahilyanagar | ४२५५३५० | ४२६०० | ५९० | वर्ग अ | ३ महिने |

| Stage | Date & Time | Stage | Date & Time |
|---|---|---|---|
| Publish Date | 21.04.2026 10.00 A. M. | Stage | 29.04.2026 03.05 P. M. |
| Document Download/ Sale Start Date | 21.04.2026 10.00 A. M. | Document Download/ Sale Start Date | 28.04.2026 03.05 P. M. |
| Circulation Start Date | ----- | Pre Bid Date | ----- |
| Bid Submission Start Date | 21.04.2026 10.00 A. M. | Bid Submission End Date | 28.04.2026 03.05 P. M. |

खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास सदर बेवसाईटवरती कळविण्यात येईल)
कार्यकारी अभियंता सा. बां. विद्युत विभाग, नाशिक कार्यालयातील सुचना फलक

जा.क्र.का अना/ई-निविदा/६८६/२०२६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विद्युत विभाग,
२ रा मजला ग्रीन बिल्डंग, सा. बां. परिसर.ऊंटवाडी रोड,
नाशिक- ४२२००२, दिनांक १५/०४/२०२६

(सही)
**कार्यकारी अभियंता**
**सा. बां. विद्युत विभाग, नाशिक**

**जिमाका/नगर/जाहि/०८/२०२६**


**पाहिजेत**
**श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स,दिल्ली नाका संगमनेर या फर्मसाठी**
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
बी.बी.ए./ एम.बी.ए. प्राधान्य
8999862759


रजि. नं. १०८४९ रजि ता. १६/०९१९४७

**राजापुर वि. कार्य. सेवा सह. सोसायटी लि. राजापुर**
**ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

### जाहीर निविदा

राजापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्यादित राजापूर, तालुका संगमनेर, जिल्हा- अहिल्यानगर, केंद्र शासनाच्या जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजनेअंतर्गत मंजूर नवीन गोदाम बांधकाम करावयाचे आहे. त्याकरिता नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून लिफाफे पद्धतीने सिलबंद निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहेत. निविदा दरपत्रक अटी, शर्ती व बांधकामाचा नकाशा इत्यादी बाबतची माहिती संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिनांक २२/०४/२०२६ ते ३०/०४/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फी |
|---|---|---|
| १ | केंद्र शासनाच्या जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजनेअंतर्गत मंजूर नवीन गोदाम बांधकाम २१२४ मे. टन (नकाशाप्रमाणे) | रु.१०००/– संस्थेच्या नावाने डी. डी. सोबत अथवा रोख भरणा करावा |

सदर निविदा दि. ३०/०४/२०२६ रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदरच्या निविदेतील दरपत्रक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवलेला आहेत. निविदा उघडण्याची प्रक्रिया दिनांक ०४/०५/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात पार पडेल. सरदच्या कामाचा व कामावरील मजुरांचा विमा रॉयल्टी, जी.एस.टी. भरण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारांची राहील.

**निविदा सोबत – १) नोंदणी प्रमाणपत्र, २)जी.एस.टी. प्रमाणपत्र, ३) पॅनकार्ड, ४)अनुभव प्रमाणपत्र इ. आवश्यक**

ठिकाण – राजापूर दिनांक – २२/०४/२०२६

सही
सभापती (मो.नं. ९८६०४१००३१)
राजापूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित,
राजापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर


READ E- NEWS ON Yuvavarta.in

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME MOHSIN MOHAMMAD SULEMAN SHAIKH
TO NEW NAME AS MOHSIN SULEMAN TAMBOLI
ADRESS - KOLHEWADI ROAD, PABALE MALA, TAL - SANGAMNER, 422605

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME SHAIKH AZIM SIDDIQUE
TO NEW NAME AS AZIM SIDDIK SHAIKH
ADDRESS:- GHAR NO 299, MOGALPURA SANGAMNER, 422605
DIST - AHILYANAGAR

CorelDRAW Ps Ai Id
WE ARE HIRING JOIN OUR TEAM
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

We Are Hiring SANGAMNER
Marketing Team
SLH Tax Advisors Pvt Ltd
Marketing Manager - 1 (25k to 50k+ Incentive)
Marketing Executive - 5 (20k to 35k + Incentive)
Digital Marketing - 1 (15k to 25k + Incentive)
Telecaller (Female) - 1 (15k to 20k + Incentive)
Salary + Incentives
Fast Growth Opportunity
Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner
Call/WhatsApp- 7264804000

We Are Hiring... FEMALE STAFF ONLY
Accountant (Tally, Financial Reporting)
Telecaller (Communication, Sales)
WALK-IN INTERVIEW
Dates: 21st - 22nd April 2026
Time- 9 AM To 4 PM
Interview Venue - LTC Office, Krushi Utpanna Bazar Samiti, Sangamner, Shop No. 15/16
Company Address: LTC Industries Survey No. 47, Plot No. 141-144, Sangamner MIDC, Sangamner, Dist. Ahilyanagar - 422605.
Send Your Resume On Whatsapp
CONTACT- 9975367595/9143304304

पाहिजेत
अनुभवी स्त्री/ पुरुष सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता – मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

गाळा विकणे आहे
२४५ स्क्वे.फुट आर.सी.सी. बांधकाम असलेला चैतन्यनगर येथील गाळा विकणे आहे
9405261738
9822315031

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

रॅक विकणे आहे
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर...
आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
साई मंगल लॉन्स
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता– समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क– प्रताप गोडगे
9890924380

पाहिजेत
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५






MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

पॅनल देणे आहे

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पॅनल देणे आहे




भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# संगमनेर मर्चंट बँकेच्या चेअरमनपदी सीए संजय राठी तर व्हा. चेअरमनपदी रवींद्र पवार यांची बिनविरोध निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सभासद आणि ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळे संगमनेर मर्चंट बँकेची घोडदौड निरंतर सुरु असून संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम आहे. शाखा विस्तार मोहिमेअंतर्गत नाशिकनंतर आता लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे बँकेची नवीन शाखा उघडली जाणार आहे अशी महत्त्वपूर्ण घोषणा बँकेचे नूतन चेअरमन सीए संजय राठी यांनी केली.

सोमवारी (ता.२०) बँकेच्या स्वामी विवेकानंद सभागृहात सहकार खात्याच्या वरिष्ठ अधिकार्यांच्या निरीक्षणाखाली चेअरमन व व्हाईस चेअरमनपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी चेअरमनपदी सीए संजय राठी तर व्हाईस चेअरमनपदी रवींद्र पवार यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडीनंतर आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

यावेळी बँकेचे मार्गदर्शक व मावळते चेअरमन, उद्योगपती राजेश मालपाणी, मावळते व्हा.चेअरमन मधुसूदन नावंदर, संस्थापक दिवंगत ओंकारनाथ मालपाणी यांच्या पत्नी मातोश्री ललितादेवी मालपाणी आदी मान्यवर उपस्थित होते. निवडीनंतर राजेश मालपाणी यांच्या हस्ते नूतन चेअरमन संजय राठी यांचा, तर



मधुसूदन नावंदर यांच्या हस्ते रवींद्र पवार यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात सीए संजय राठी यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, राजेशभाऊ मालपाणी यांच्या नेतृत्वाखाली बँकेने हीरक महोत्सवी वर्ष साजरे केले आहे. गेल्या ३० वर्षांपासून माझे या बँकेशी ऋणानुबंध आहेत. संस्थापक ओंकारनाथजींनी दिलेला पारदर्शकतेचा आणि काटकसरीचा वारसा आपण पुढे नेत आहोत. आज बँकिंग क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले असून रिझर्व्ह बँकेची धोरणे बदलली आहेत. आता ग्राहकांचे राज्य असून स्पर्धेमुळे नफ्याचे प्रमाण केवळ एका टक्क्यावर आले आहे. आगामी काळ हा 'डोअर स्टेप बँकिंग' आणि 'डिजिटल बँकिंग'चा आहे. कार्यक्षम कर्मचारी वर्ग आणि संचालक मंडळाच्या साथीने आपण बँकेची प्रगती अधिक वेगवान करु असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मावळते चेअरमन राजेश मालपाणी यांनी बँकेच्या प्रवासाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, १९९० मध्ये संस्थापक ओंकारनाथजींच्या काळात बँकेने शंभर कोटींच्या संमिश्र व्यवसायाचा टप्पा गाठला होता. १९९६ मध्ये १०० कोटींच्या ठेवींचे उद्दिष्ट पूर्ण झाले आणि आता हीरक महोत्सवी वर्षात सर्वांच्या सहकार्याने एक हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय सर्व सहकारी आणि कर्मचार्यांना देताना, करते हो तुम कन्हैय्या, मेरा नाम हो रहा है... या ओळी उद्धृत करत कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मातोश्री ललितादेवी मालपाणी यांनी बँकेच्या स्थापनेच्या वेळच्या हृदयस्पर्शी आठवणींना उजाळा दिला. मावळते व्हाईस चेअरमन मधुसूदन नावंदर यांनीही आपला कार्यकाळ सार्थ ठरल्याचे सांगत आभार मानले. या कार्यक्रमाप्रसंगी नरेंद्र चांडक, विवेक कासार, अमित पंडित, डॉ.संजय मालपाणी, संजय लाहोटी, श्रुती राठी, बापूसाहेब टाक, महेश वाकचौरे, सुधाकर जोशी, मनीष मालपाणी, गिरीश मालपाणी, जयवंत पवार आणि ओंकारनाथ भंडारी यांची शुभेच्छापर भाषणे झाली.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन संतोष करवा यांनी केले, तर आभार प्रदर्शन नूतन व्हाईस चेअरमन रवींद्र पवार यांनी केले. या निवडीचे स्वागत करण्यासाठी शहरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

# मल्हारवाडीत पोल्ट्रीमुळे माशांचा उच्छाद

## प्रशासनाकडे कडक कारवाई करण्याची मागणी

### नागरीकांचे आरोग्य धोक्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पठार भागातील खंदरमाळवाडी गावांतर्गत असलेल्या मल्हारवाडी येथे पोल्ट्री व्यवसायामुळे माशांचा प्रचंड प्रादुर्भाव वाढला असून स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. या प्रकारामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

मल्हारवाडी परिसरात सध्या माशांचे अक्षरशः साम्राज्य निर्माण झाले आहे. घराघरांत माशांचा उपद्रव वाढल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे. अन्नपदार्थ, पिण्याचे पाणी तसेच घरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात माशा बसत असल्याने आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे परिसरात आजारांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान या गंभीर समस्येमुळे परिसरात संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. प्रशासनाने तात्काळ याकडे लक्ष देऊन संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा होणाऱ्या परिणामांना शासन-प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा सतिष भुजबळ, सुभाष अमुप, रमेश गाडेकर, विलास गाडेकर, निवृत्ती गाडेकर, साईनाथ गाडेकर, प्रशांत गाडेकर, दत्तात्रय भुजबळ, बिपीन अमुप, कैलास गाडेकर, बंडू गाडेकर, बाळकृष्ण गाडेकर, संजय गाडेकर, उत्तम अमुप, चेतन गाडेकर, विकास गाडेकर, दत्ता राहिज, लक्ष्मण राहिज, गणेश गाडेकर, सुरेश लेंडे, सखाराम गाडेकर, अशोक अमुप यांसह आदींनी दिला आहे.

> **पोल्ट्री व्यवसायिक स्वतःच्या फायद्यासाठी व्यवसाय करत असले तरी त्याचा विपरीत परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. पोल्ट्री फार्ममधील कचरा, मृत कोंबड्यांची विल्हेवाट न लावणे, स्वच्छतेचा अभाव यामुळे माशांची संख्या झपाट्याने वाढत आहे.**
>
> **सतिष भुजबळ**
> **ग्रामस्थ**

> **माशांचा त्रास इतका वाढला आहे की घरात राहणे कठीण झाले आहे. औषध फवारणी केल्यानंतरही घमेलेभर माशा मरून पडत आहेत. अशा परिस्थितीत जगायचे कसे. अक्षय तृतीया सारखा महत्त्वाचा सणही माशांच्या उपद्रवामुळे साजरा करता**
>
> **सुभाष अमुप**
> **स्थानिक रहिवासी**

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY

| | |
|---|---|
| मार्केटिंग | १० जागा |
| टेली कॉलिंग | १० जागा |
| सेल्स ऑफिसर | ०५ जागा |
| ड्रायव्हर | ०२ जागा |

अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रम्हानंद लहरी प्रगट केली । - संत नामदेव महाराज
श्री ज्ञानेश्वरी साप्ताहिक निरूपण
निरुपणकार - ह.भ.प. आचार्य अरुण महाराज फरगडे
प्रत्येक गुरूवारी सायंकाळी ५.३० वाजता
ठिकाण - श्री ज्ञानेश्वर मंदिर, उपासनी गल्ली, घासबाजार, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर
ह.भ.प. आचार्य अरुण महाराज फरगडे

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13


दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605
DEVISH ADVERTISER

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25